दै. प्रजावाणी (१)

### बहुसदस्यीय प्रभागामुळे प्रचारासाठी जादा कालावधी मिळण्याची.शक्यता

# सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात आचारसंहिता?



नांदेड, दि.७: येत्या ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या महापालिका निवडणुकीची आचारसंहिता पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होण्याची शक्यता आहे. ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यात दिवाळीचा सण असल्याने दुसऱ्या आठवड्यातच मतदानाची प्रक्रिया पूर्ण होईल, असे सांगितले जाते. मागच्या निवडणुकीसाठी तीन सप्टेंबरला आचारसंहिता जाहीर होऊन १४ ऑक्टोबरला मतदान झाले होते. यंदा चार किंवा पाच सदस्यांचा एक प्रभाग असल्यामुळे प्रचारासाठी जादा कालावधी देण्याच्या उद्देशाने निवडणूक आयोग विचार करीत असल्याचे बोलले जात आहे.

२०१२ साली झालेल्या निवडणुकीत दोन सदस्यांचे ३९ व तीन सदस्यांचा एक अशा ४० प्रभागात ८१ सदस्य निवडून आले होते. आगामी निवडणुकीत चार सदस्यांचे १९ व पाच सदस्यांचा एक अशा २० प्रभागातून ८१ सदस्य निवडून द्यावे लागणार आहेत. सदस्यांची संख्या पूर्वी इतकीच राहणार असली, तरी प्रभागातील मतदारांची संख्या वाढल्यामुळे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना प्रचारासाठी जादा कालावधी मिळावा, अशी अपेक्षा आहे.

येत्या १९ ऑगस्ट रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध होणार आहे. यावर हरकती व सूचना ▪पान २ वर

## आक्षेप सुनावणीचा अहवाल आयोगाकडे

प्रभाग रचना व आरक्षण सोडतीवर आक्षेपांवर सुनावणी पूर्ण झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाचे प्राधिकृत अधिकारी तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव संतोषकुमार यांच्या शिफारशीसह मनपा आयुक्त गणेश देशमुख यांनी शनिवारी (दि.५) आपला अहवाल राज्य निवडणूक आयोगाकडे सादर केला. या अहवालावर आयोगाकडून दहा ऑगस्ट किंवा त्यापूर्वी निर्णय होणे अपेक्षित असून, १४ ऑगस्ट रोजी अंतिम प्रभाग रचना व आरक्षण सोडतीची अधिसूचना राज्य निवडणूक आयोगाकडून जाहीर केली जाणार आहे.